महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक **अक्षराज**
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
गुंतवणूक २.५ लाख फक्त
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

● वर्ष ३ रे ● अंक २५५ वा ● पाने ४ | बुलडाणा, गुरुवार, दि.२५ एप्रिल २०२४ | ● RNI NO. : MAHMAR/2022/82056 ● किंमत : ३ रुपये



**अक्षराज : आकाश जयस्वाल**
**दि.२४, माहूर (नांदेड) :**
महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.
**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

# थोडक्यात

## शरद पवारांनी आधी शेतकरी विधवांची माफी मागावी, गृहमंत्री अमित शाह




**दि.२४, अमरावती :** यापूर्वी नवनीत राणा यांना पाठिंबा देऊन आपली चूक झाली, आपण अमरावतीकरांची माफी मागतो, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार म्हणाले होते, पण ते मुख्यमंत्री असताना देशाचे कृषीमंत्री असताना विदर्भासाठी त्यांनी काय केले.

त्यांच्या कार्यकाळात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांनी या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींची माफी मागायला हवी, अशी टीका गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी येथे केली. अमरावती मतदार संघातील भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ सायन्सकोर मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार अनिल बोंडे, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, प्रकाश भारसाकळे आदी उपस्थित होते. अमित शाह यांनी आपल्या भाषणात काँग्रेससह शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.

ते म्हणाले, शरद पवार यांच्या कार्यकाळात विदर्भातील सिंचनाकडे दुर्लक्ष झाले, त्यामुळे शेतकरी संकटात सापडले. भाजप-शिवसेना सरकारने सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी पुढाकार घेतला असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे जलक्रांती घडून येणार आहे.

उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना अमरावतीत उमेश कोल्हे यांची हत्या करण्यात आली. स्वत:ला हिंदूहितरक्षक सांगणारे उद्धव ठाकरे यांनी काहीच कारवाई केली नाही. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले आहे. आता कुण्या उमेश कोल्हेची हत्या होणार नाही, असे अमित शाह म्हणाले.

भाजपची सत्ता पुन्हा आली, तर मागासवर्गीयांचे आरक्षण चालले जाईल, अशी अफवा काँग्रेसकडून पसरवली जात आहे. पण, आरक्षण कुठल्याही परिस्थितीत हटवले जाणार नाही, ही मोदी यांची गॅरंटी आहे. आम्ही बहुमताचा वापर हा ३७० कलम हटविण्यासाठी केला. तिहेरी तलाकची प्रथा हटवली. नागरिकत्व सुधारणा कायदा आणला. त्यामुळे राहुल गांधी यांनी शेखचिल्ली प्रमाणे स्वप्ने पाहू नयेत, अशी टीका अमित शाह यांनी केली.

काश्मीरचे महाराष्ट्रातील जनतेला काय देणे घेणे, असे वक्तव्य काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी केले. काश्मीरसाठी जीव देऊ शकतो, याची त्यांना कल्पना नाही. मोदींनी कलम ३७०, तिहेरी तलाक, दहशतवाद, महाराष्ट्रातील नक्षलवाद संपवण्याचे काम केले, असा दावा त्यांनी केला.

**विदर्भाला काहीच मिळाले नाही – फडणवीस**

शरद पवार हे मुख्यमंत्री, देशाचे कृषीमंत्री असताना विदर्भाला त्यांनी काहीच दिले नाही. आम्ही सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ४ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. आचारसंहिता संपल्याबरोबर भावांतर योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले. अमित शाह यांचे भाषण अखेरच्या टप्प्यात असताना अवकाळी पावसाचा व्यत्यय आला.

# काँग्रेसच्या घोषणेने गरीब आणखी गरीब झाले : नितीन गडकरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, बुलढाणा :** देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तिपासून तब्बल साठ वर्षे सत्तेत राहणाऱ्या काँग्रेसने 'गरिबी हटाव'चा नारा दिला. मात्र यामुळे गरिबी तर हटली नाहीच, उलट गरीब आणखी गरीब झाला, अशी टीका केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांनी येथे केली.



प्रचाराच्या अंतिम टप्प्यात बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ चिखली येथे सभा पार पडली. यावेळी गडकरी यांनी इतर नेत्यांप्रमाणे विरोधकांवर जहाल टीका करण्याचे कटाक्षाने टाळले. काँग्रेसच्या दीर्घ राजवट आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या काळातील विकासकामांची त्यांनी संयमी भाषेत चिकित्सक तुलना केली. तसेच भाषणाचा रोख विकासकामावरच ठेवला. काँग्रेसने आपल्या राजवटीत विविध योजनांची घोषणा केली, 'गरिबी हटाव'चा नारा दिला. तसेच आधी २० कलमी, नंतर ५ कलमी कार्यक्रमाची घोषणा केली. मात्र, गरिबी तर हटली नाहीच, गरीबच बाजूला हटला, तो आणखी गरीब झाला. याचे कारण त्यांनी भरमसाठ घोषणा दिल्या, योजना आखल्या. मात्र, त्याची नियोजनबद्ध अंमलबजावणी केली नाही. यामुळे त्या व्यर्थ ठरल्या. उलट पंतप्रधान मोदी यांनी योजना व अंमलबजावणीची सांगड घातली. यामुळे त्यांच्या काळात ६० वर्षांच्या तुलनेत जास्त विकास झाला, असे गडकरी यांनी सांगितले.

भारताला विश्वगुरु, आर्थिक महासत्ता करण्यासाठी महायुतीला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उमेदवार प्रतापराव जाधव यांनी आपल्या विकासकामांची माहिती देत पुढील पाच वर्षांत आपण खामगाव-जालना, अकोट-खंडवा रेल्वेमार्ग, नदीजोड प्रकल्प यांच्या अंमलबजावणीला चालना देणार असल्याचे सांगितले. यावेळी आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, माजी आमदार धृपदराव सावळे, विजयराज शिंदे यांच्यासह महायुतीचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# भाजपा देशाचे भविष्य तर काँग्रेस भूतकाळ – छ.उदयनराजे भोसले

ही निवडणूक बेईमानीशी लढण्यासाठी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज असलेले खासदार उदयनराजे भोसले यांचे नेतृत्व सर्वांनी हृदयात जपून त्यांना लोकसभेत पाठवावे.
**(चित्रलेखा माने – कदम, भाजपा प्रदेश महिला उपाध्यक्ष)**

वाठार जिल्हा परिषद गट रहिमतपूर नगरपालिका या परिसरामध्ये भाजपने कोट्यावधींचा निधी देऊन विकास कामे केली आहेत. प्रत्येकाने जर भूतनिहाय काम केलं तर मोठं लीड उदयनराजेंना आपण देऊ शकतो.
**(धैर्यशील कदम, जिल्हाध्यक्ष भाजप)**

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२४, सातारा :** भारतीय जनता पक्षाने गेल्या १० वर्षांत देशाचा कायापालट करण्याचे काम केलेले आहे. दूरदृष्टी असलेले नरेंद्र मोदींसारखे खंबीर नेतृत्व देशाला मिळाले असल्यामुळे मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप हा देशाचे भविष्य आहे तर काँग्रेस पक्ष हा भूतकाळ आहे. असा टोला खासदार उदयनराजे भोसले यांनी यावेळी बोलताना लगावला. वाठार किरोली जिल्हा परिषद गट, एकंबे व कन्हेरखेड पंचायत समिती गण आणि रहिमतपूर नगरपालिका क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा मेळावा येथील राधेश्याम मंगल कार्यालयात झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश भाजप महिला आघाडीच्या उपाध्यक्ष चित्रलेखा माने- कदम, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष मनोजदादा घोरपडे, शिवसेनेचे नेते वासुदेव माने, ज्येष्ठ नेते भीमराव पाटील, रामकृष्ण वेताळ, किरण बर्गे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सचिन भिलारे, माजी उपनगराध्यक्ष शेखर माने, माजी उपनगराध्यक्ष चांदगणी आतार, डॉ. निलेश भोसले, ॲड. महेश भोसले, विक्रमसिंह कदम, संपतराव माने, संतोष कणसे, दीपक नलावडे, हर्षल गुरव, जयवंतराव माने, दीपक माने, समीर भोसले, अमर माने, सचिन बेलागडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.




महिला सक्षमीकरण, तरुणांच्या हाताला रोजगार, डिफेन्स मध्ये कामगिरी, सायन्स अँड टेक्नॉलॉजी मध्ये केलेली प्रगती मोदींच्या नेतृत्वाखाली झाली आहे. काँग्रेसच्या ५० ते ५५ वर्षांच्या सत्तेच्या काळामध्ये अनेकांचा उमेदीचा काळ वाया गेला. काँग्रेसला दुसरा पर्याय नव्हता, त्यामुळे देशातील जनतेला गृहीत धरण्यात आले. आता मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपचा चांगला पर्याय लोकांना उपलब्ध झाल्याने गेल्या १० वर्षांपासून भारतातील जनता भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे. महायुतीच्या वतीने नरेंद्र मोदी हे देशाचे नेतृत्व करणार हे निश्चित झाले असले तरी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीकडे नेतृत्वच नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे नेतृत्व नसलेली आघाडी देशाचा काय विकास करणार.

# गुंडागर्दीला उत्तर मतपेटीतुन द्या – राधाकृष्ण विखे पाटील

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२४, सुपा (नगर) :** पारनेर तालुक्यातील ग्राम पातळीपासुन तर सेवा सोसायटी, पंचायत समिती, जिल्हा परीषद पर्यंत जातीने लक्ष घालुन गटा-गटात भांडणे लावुन वैर निर्माण करणे, स्वतः ची दहशत निर्माण करणे. येणार्या निवडनुकीत तुम्हाला याचे उत्तर मतपेटीतुन द्यायचे आहे. गुंडाराज आता कुठेतरी बंद कारागृहात कायम स्वरुपी बंद करायचे आहे. या त्रासाला जनता कंटाळली आहे. म्हणुन आपला उमेदवार डॉ.सुजय विखे आजच विजयी झाला आहे. असा टोला ही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लोकनेता म्हणून घेणारा निलेश लंके यांच्या नावाचा उल्लेख नकरता लगावला आहे.



ना.राधाकृष्ण विखेंनी बुधवार, दिनांक २४ एप्रिल रोजी पारनेर दौर्यावर येत असतांनाच सुपा येथील पवार वाडी येथे पारनेर तालुका दुध संघाचे अध्यक्ष, सुपा येथील माजी उपसरपंच दत्ता नाना पवार यांच्या निवासस्थानी सुपा गटातील कार्यकर्त्यांचा सवाद साधला तेंव्हा ते बोलत होते.

शेतकरी वर्गाला दुध संघात प्रती लिटरला ५ रुपये अनुदानाचा मोठ्या प्रमाणावर लाभ झाला आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर तब्बल ७० कोटी रुपये जमा झाले आहेत. दुध भेसळीचे प्रमाणही वाढले होते तेंही कमी झाले आहे.भेसळ ही पुर्ण बंद करायची आहे.असे ही पालकमंत्र्यांनी सांगितले.

गुंडा गर्दीमुळे सुपा औद्योगिक वसाहतीत अनेक उद्योग बाहेर गेले आहेत, त्याला सर्वस्वी जबाबदार कोण आहे ते मी सांगण्याची गरज नाही. भविष्यात उद्योजकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी आपण आपला हाक्काचा खासदार निवडुन द्यायचा आहे. कार्यक्रमासाठी माजी सभापती काशिनाथ दाते, भाजप नेते विश्वनाथ कोरडे, तालुका प्रमुख राहुल शिंदे (पाटील), सुनिल थोरात, विक्रमसिंह कळमकर, रामचंद्र मांडगे, सभापती गणेश शेळके, मनिषा रोकडे (सरपंच सुपा), योगेश रोकडे (युवा नेता), दत्ता नाना पवार(ता.दुध संघ), सुनिल पवार, सुरूश नेटके, अविनाश पवार, सुखदेव पवार, प्रतापसिंह शिंदे आदी पदाधिकारी मोठ्या संखेने उपस्थित होते.




## बदलत्या हवामानाचा फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही जाऊ शकतो. मागील वर्षी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. मागील वर्षी उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकराना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे.

कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ अशा घटना वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत.

निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# चिन्मय मांडलेकरचा निर्णय चुकला का ?



अनेक चित्रपट आणि मालिकांतून छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका दमदारपणे साकारणारा अभिनेता चिन्मय मांडलेकर याने यापुढे छत्रपती शिवरायांची भूमिका न करण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक माध्यमांवर एक ध्वनिचित्रफित प्रसारित करून हा निर्णय घेण्यामागील आपली भूमिका त्याने मांडली आहे. ही ध्वनिचित्रफित पाहणाऱ्यांकडून सामाजिक माध्यमांवर उलट सुलट प्रतिक्रिया येत आहेत. त्याची पत्नी नेहा जोशी-मांडलेकर हिनेही एक ध्वनिचित्रफित सामाजिक माध्यमांवर प्रसारित करून आपल्या मुलाचे नाव जहांगीर का ठेवले आणि त्या नावाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्या ध्वनिचित्रफितीवर लोकांनी प्रतिक्रियांच्या माध्यमातून आपले म्हणणे मांडले आहे. चिन्मय मांडलेकरने आपल्या मुलाचे नाव जहांगीर ठेवल्याने त्याला वेळोवेळी ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. अनेक चित्रपट आणि मालिकांतून छत्रपती शिवरायांची भूमिका साकारुनही लोक आपल्या मुलाच्या नावावरून आपल्याला ट्रोल करत असतील तर यापुढे मी शिवरायांची भूमिका करणार नाही असे त्याने जाहीर केले आहे.

जहांगीर हा पर्शियन शब्द असून जहांगीरचा अर्थ जगज्जेता असा होतो शिवाय त्यांच्या मुलाचा जन्म २१ मार्च म्हणजे 'जमशेदी नवरोज' या दिवशी झाला असल्याने मुलाचे नाव जहांगीर असे ठेवल्याचे चिन्मयच्या पत्नीने सांगितले आहे. भारतरत्न जमशेदजी टाटा यांचे नावही जहांगीर होते असेही तिने यावेळी म्हटले आहे. तिच्या या उत्तरावरून मांडलेकर उभयता हिंदू असताना मुलाचे नाव ठेवण्यासाठी त्यांना एका पार्शियन दिवसाचा आधार का घ्यावासा वाटला असेही काही ट्रोलर्सचे म्हणणे आहे. २१ मार्च हा जागतिक वन्यदिनसुद्धा आहे. वनामध्ये विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, झाडे, फुले आणि वेली असतात त्यापैकी एखादे सुंदर नाव मांडलेकरांना आपल्या मुलासाठी का बरे सुचले नाही असाही प्रश्न काहींकडून विचारला जात आहे. जहांगीर नावाचा अर्थ विश्वविजेता असा आहे, तर मांडलेकरांनी मुलाचे नाव विश्वजीत ठेवायला हवे होते असा सल्लाही काही मंडळींकडून दिला जात आहे. जहांगीर हे नाव पर्शियन असले, तरी जहांगीर मोगल सम्राट अकबराच्या मुलाचे नाव होते हे साऱ्या भारतविश्वाला माहित आहे. सत्तेच्या लालसेपोटी भारतात येऊन मोगलांनी या देशाचे सारे वैभव लुटले. एकेकाळी ज्या देशात सोन्याचा धूर निघत असे त्या देशाला मोघलांनी कंगाल बनवले. तलवारीच्या बळावर येथे प्रचंड लूटमार करवली, बाया बापड्यांच्या अब्रूवर घाला घालून त्यांना आपल्या जनानखान्यात डांबले. येथील नागरिकांवर अनन्वित अत्याचार केले, अनेकांची धर्मांतरने घडवून आणली, धर्मांरीत न होणाऱ्या कित्येकांच्या कत्तली केल्या, हिंदूंचे प्रेरणास्रोत असलेली कितीतरी प्राचीन मंदिरे त्यांनी उध्वस्त केली. अशा मोघलांच्या वंशातील अकबराचा मुलगा सलीम अर्थात जहांगीर हासुद्धा अत्यंत क्रूर होता.

स्त्रियांचा आणि मद्यपानाचा तो शौकीन होता. दिवसभर मद्याच्या नशेत तो झिंगत असे. जहांगीरच्या मुलाने त्याच्याशी बगावत केली म्हणून त्याने मुलाचे डोळे फोडले. नागरिकांना तो अत्यंत क्रूरपणे शिक्षा देत असे. आपल्याविरोधात बगावत करणाऱ्या मुलाला साहाय्य केले म्हणून शिखांचे पाचवे गुरु अर्जन देव यांना अटक करून त्यांना त्याने फासावर लटकवले. अनेकदा छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणाऱ्या चिन्मयला मोगल बादशहा जहांगीरचा हा सर्व इतिहास तर नक्कीच ठाऊक असावा. असे असताना त्याने आपल्या मुलाचे नाव जहांगीर ठेवण्याचे धाडस केले म्हणजे भविष्यात त्याला ट्रोलिंगचा सामना करावा लागेल हे ज्ञात असावे. असेही काहींचे म्हणणे आहे. भारताचा पौराणिक इतिहास पाहिल्यास रावण, कंस, शिशुपाल, दुर्योधन, दुःशासन यांसारखे कितीतरी महापराक्रमी राजे महाराजे भारतभूमीत होऊन गेले; मात्र ही समस्त मंडळी अधर्माने वागल्याने यांची नावे कोणीही हिंदू आपल्या मुलांना देत नाहीत.

मुंबईतील परकीय आक्रमकांची, अधिकाऱ्यांची नावे ज्या रेल्वे स्थानकांना दिली गेली आहेत ती बदलण्याची प्रक्रिया सध्या शासन करत आहे. असे असताना आक्रमकांच्या वंशावळीतील जुलमी राजाच्या नावाने आपल्या मुलाचे नाव असणे चिन्मयला रुचते का ? सैफ अली खान आणि करीना यांनी आपल्या एका मुलाचे नाव तैमूर आणि दुसऱ्याचे जेह म्हणजेच जहांगीर असे ठेवले तेव्हा त्यांनाही देशभरातून ट्रोल करण्यात आले होते. त्यांनीही आपल्या मुलांच्या नावांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न त्यावेळी केला होता, तरी आजही त्यांना या नावांवरून ट्रोल केले जात आहे . जनमानसांत प्रसिद्ध असणाऱ्या प्रत्येकाच्या बारीक सारीक हालचालींची, त्यांच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगांची, त्यांच्या विधानांची आणि निर्णयांची प्रसिद्धी माध्यमांत बातमी होत असते, त्यामुळे या सर्वांतून आपली प्रतिमा समाजापुढे चुकीच्या पद्धतीने जाणार नाही. याबाबतची काळजी या मंडळींनी घेणे आवश्यक आहे.

ती न घेतल्यास सध्या सामाजिक माध्यमांचे युग असल्याने ट्रोलिंगचा सामना हा करावाच लागणार आहे. सेलिब्रिटींचे लग्न, त्यांच्या घरात लहानग्यांचे आगमन होण्याची चाहूल लागणे, त्यांच्या मुलांची समाजासमोरील पहिली झलक या सर्व बाबी समाजमाध्यमांवर प्रसारित होतात, बातम्यांमध्ये प्रसिद्ध होतात त्यावेळी त्यांच्यावर चाहत्यांसह संपूर्ण समाजाकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जातो. तेव्हा या मंडळींना कमालीचा आनंदही होतो, तेव्हा हे सर्वजण हा आमचा कौटुंबिक भाग आहे त्यामुळे लोकांनी यामध्ये नाक खुपसू नये, असले सल्ले सामाजिक माध्यमातून कधी देताना दिसत नाहीत. मात्र जेव्हा तुमच्या एखाद्या वादग्रस्त निर्णयाबाबत तुम्हाला ट्रोल केले जाते तेव्हा तुम्हाला तुमचे कुटुंब, तुमचा कौटुंबिक निर्णय हे सर्व आठवते. मांडलेकर उभयतांनी आपल्या मुलाचे ठेवलेले नाव ही जरी त्यांची वैयक्तिक बाब असली तरी ते एक सेलिब्रिटी असल्याने समाजात या सर्वांवर उलट सुलट चर्चा होणे स्वाभाविक आहे. चिन्मयने आपल्या मुलाचे नाव जहांगीर ठेवल्याचे माहित असूनही त्यानंतर त्याने केलेल्या छत्रपती शिवरायांच्या भूमिकेचे प्रेक्षकांडूनच आजतागायत स्वागतच करण्यात आले आहे. मुलाचे नाव जहांगीर ठेवले म्हणून प्रेक्षकांनी त्याच्या चित्रपटांवर बहिष्कार घातलेला नाही. काश्मीर फाईल्स चित्रपटातील त्याच्या नकारात्मक भूमिकेलाही प्रेक्षकांनी उचलून धरले होते.

मुलाच्या नावावरून कुटुंबाला ट्रोल केले जात आहे म्हणून यापुढे छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका न करण्याचा चिन्मयने घेतलेल्या निर्णयाने मराठी चित्रपट सृष्टीचे काही नुकसान होणार आहे का ? तर अजिबात नाही. शिवरायांची भूमिका दमदारपणे साकारणारे अनेक कलाकार आज मराठी चित्रपटसृष्टीत आहेत तर अनेक नवोदित कलाकार अशा अजरामर भूमिका साकारण्याच्या प्रतीक्षेत आहेत. आज चिन्मयने शिवाजी महाराजांची भूमिका नाकारली तर उद्या ती भूमिका या नवोदितांना मिळेल.

त्यांनी या संधीचे सोने केले, तर भविष्यात चिन्मयला महाराजांची भूमिका करण्याबाबत कोणी विचारणार आहे का? चिन्मयने घेतलेल्या निर्णयातून हानी चिन्मयचीच होणार आहे हे त्याने लक्षात घ्यायला हवे ! छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका करणे सोडण्याऐवजी काही दिवस चित्रपटसृष्टीपासून अथवा सामाजिक माध्यमापासून दूर राहण्याचा निर्णय चिन्मयने घेतला असता, तर एकवेळ चिन्मयला लोकांकडून सहानुभूती तरी मिळाली असती; मात्र त्याने केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचीच भूमिका करणार नसल्याचे सांगितल्याने 'दैव देते आणी कर्म नेते', 'चिन्मयचा दुसरा निर्णयही चुकला' अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया सामाजिक माध्यमांतून व्यक्त केल्या जात आहे. चिन्मय मांडलेकर हा गुणी आणि कसदार अभिनयासाठी नावाजलेला कलाकार आहे. आपले विचार तो परखडपणे व्यक्त करत असतो. दि काश्मीर फाईल्स चित्रपटाच्या वेळी चित्रपटाला विरोध करणाऱ्यांची तोंडे त्याने बंद केली होती.

सध्या ज्या विवंचनतेतून तो जात आहे असे प्रसंग अनेक सेलिब्रिटी मंडळींवर येत असतात. अशा वेळी स्थिर राहून कोणाचे ऐकायचे कोणाचे नाही, समाजासमोर कसे व्यक्त व्हायचे, कोणते निर्णय घ्यायचे याबाबतची कसोटी लागते. चिन्मयसुद्धा योग्य निर्णय घेऊन यातून लवकरच बाहेर पडेल याबाबत शंका नाही !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## डोके..

सनदशीर मार्गे
वापरलेले डोके
पक्षासाठी निधी
निवडणूक रोखे

दृश्य स्वरूप बरे
अदृश्य ती नाके
मिळे ती माहिती
कोण असे बोके

शाई किती बाई
टोपण भलेझाके
पैसेतर लागतात
सर्व जाणे पक्के

ओपन हे सिक्रेट
ठरावलेले टक्के
काळ्या पैसा देई
जोर जोरा धक्के

दूध से धुले नसे
सकलजनलुख्खे
जमवायची माया
कोण सोडे मौके

बॉल येता चांगला
मारी चौके छक्के
येन केन प्रकारेण
फिक्स मॅच जिंके

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## महाविरण कंपनीचे अधिकारी लोखंडे यांना बडतर्फ करा- गणेश इंगळे



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२४,माळशिरस (सोलापूर) :** महावितरण कंपनीचे अधिकारी लोखंडे यांना बडतर्फ करा गणेश इंगळे म.रा.वि.वि.कंपनीचे अकलूज चे अधिकारी लोखंडे साहेब हे मनमानी कारभार करत आहेत म्हणून त्यांना बडतर्फ करावे अशी मागणी युवासेनेचे जिल्हाप्रमुख यांनी निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे यांना केली आहे.सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू आहेत संगम गावामध्ये शासनाने दुष्काळ जाहीर झाला आहे.संगम गावातून भिमा नदी वाहत आहे.जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने भिमा नदी काठ हा ६ तास लाईट सोडण्याचे आदेश दिले आहेत.व आठवड्यातून एकदा म्हणजे बुधवारी म.रा.वि.वि.कंपनीचा मेंटनस दुरुस्ती साठी दिवस भर लाईट बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.बुधवारी फक्त पिण्याच्या पाण्या साठी दिवसातून एक तास लाईट चालू ठेवण्यास सांगितले आहे.परंतु लोखंडे साहेब यांनी बुधवार दि १७ एप्रिल २०२४ रोजी म रा वि वि कंपनी चे संगम या गावा मध्ये मेंटनेस चे एक तास ही काम नसताना भिमा नदी काठी फक्त १ च तास लाईट दिली आहे त्यानंतर बुधवार दि २४ एप्रिल २०२४ रोजी नियमानुसार रात्र पाळी रात्री १ वाजून ३५ मिनिटांनी लाईट चालू होऊन सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी बंद होणार ही नियमानुसार असताना पाळी मध्ये मेंटनस करता येत नाही तरीही संगम येथील ऑफिस ला लाईट फक्त १ च तास सोडण्याचे आदेश दिले होते याची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच हे लोखंडे नावाचे अधिकारी हे शेतकऱ्यांचा कॉल रिसिव्ह करत नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांना अकलूज येथील अधिकाऱ्यांना संपर्क करावा लागत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आईन उन्हाळ्यात नाहक त्रास होत आहे लोखंडे साहेब यांच्या मनमानी कारभारामुळे शेकऱ्यांचे आतोनात नुकसान होत आहे त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवरती लवकरात लवकर कारवाई करून बडतर्फ करण्यात यावे अन्यथा अकलूज येथील कार्यालयावर युवा सेनेच्या वतीने लोखंडे या अधिकाऱ्यापासून शेतकऱ्यांची नाहक त्रासाची सुटका करण्यासाठी नग्न आंदोलन करण्यात येईल असा ईशारा युवा सेनेच्या वतीने देण्यात आला आहे.यावेळी शिवसेना विधानसभा तालुकाप्रमुख महादेव बंडगर, संजय कांबळे, सागर साळुंके, करण कांबळे उपस्थित होते.

## दाढी, कटिंग मध्ये २५ टक्के सुट ; दवाखाना फ्री... पण मतदान करा




**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२४, नांदगाव (नाशिक) :** मतदानाची टक्केवारी वाढवी जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करून लोकशाहीचे हात बळकट करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, यासाठी नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्य अधिकारी धांडे यांनी नांदगाव शहरातील डॉक्टर्स व नाभिक संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती.

बैठकीत झालेल्या निर्णयानुसार २० मे ला मतदान करणाऱ्या नागरिकांना दाढी कटिंग मध्ये २५टक्के सूट देण्यात येत असल्याचे नाभिक संघटने कडून तसेच डॉक्टर संघटनेच्या वतीने आरोग्य तपासणी व इंजेक्शन फी पूर्णतः माफ करण्यात येईल असा अभूतपूर्व निर्णय घेण्यात आला.

या निर्णयासाठी धांडे यांनी डॉक्टर्स व नाभिक संघटनेचे आभार व्यक्त केले. पालिका डॉक्टर्स व नाभिक संघटनेच्या मतदानचा टंक्का वाढवण्यासाठीचा हा निर्णय संपूर्ण नांदगाव शहरात चर्चेचा विषय बनला आहे. हे मात्र नक्की.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मतदान जनजागृतीसाठी सरसावले कवी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नांदेड :** येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या काव्यपौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमात मतदानासाठी आवाहन करणाऱ्या कवितांचे सादरीकरण करुन मतदान जनजागृतीसाठी नांदेडचे कवी सरसावले. या कविसंमेलनात शहर तसेच जिल्ह्यातून कविंनी सहभाग नोंदविला. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, काव्य पौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, कैलास धुतराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या मालेतील ही ८२ वी काव्यपौर्णिमा असून चैत्र पौर्णिमेच्या निमित्ताने ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्यात आली. या कविसंमेलनात शरदचंद्र हयातनगरकर, प्रल्हाद घोरबांड, रुपाली वागरे वैद्य, चंद्रकांत कदम, गौतम कांबळे, कैलास धुतराज, नागोराव डोंगरे, बालाजी कळसे, प्रज्ञाधर ढवळे, गणेश भालेराव, अनुरत्न वाघमारे यांनी सहभाग घेतला. सर्व कविंनी एकापेक्षा एक सरस आणि दमदार कवितांचे सादरीकरण करुन मतदान जनजागृती केली.

कविसंमेलनाचे प्रास्ताविक काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. संवादसूत्र ज्येष्ठ कवी पांडुरंग कोकुलवार यांनी हाती घेतले तर आभार प्रदर्शन शीघ्रकवी कैलास धुतराज यांनी केले. या कविसंमेलनाचे सादरीकरण सोशल मिडियावरही करण्यात आले. यावेळी रसीक म्हणून सुभाष लोखंडे, पांडुरंग आडबलवार, राहुल जोंधळे, संजय गडपायले, आनंद चिंचोले, संतोष तेलगावे, साईनाथ रहाटकर, भगवान आमलापुरे, चंद्रकांत मोरे, धम्मोदय वाघमारे, पंडित कांबळे, प्रशांत गवळे, रमेश मुन्नेश्वर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. ८२ व्या काव्य पौर्णिमेच्या यशस्वीतेसाठी मारोती कदम, शंकर गच्चे, भैय्यासाहेब गोडबोले, बाबुराव पाईकराव, रणजित गोणारकर, बाबुराव पाईकराव यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक पुस्तक दिनानिमित्त उभारली पुस्तकांची गुढी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नांदेड :** पुस्तक हे मस्तक घडवित असते. चांगली पुस्तकं मानवी मनावर सुसंस्कार घडवून आणतात. वाचनाने मेंदू समृद्ध होतो. विचारांच्या कक्षा रुंदावतात. तद्वतच मुलांवर योग्य संस्कार व्हावेत यासाठी शालेय बाल वाचनालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात.

जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत पुस्तकांचीच गुढी उभारण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, उपाध्यक्ष चांदू झिंझाडे, मारोती चक्रधर, आनंदा गोडबोले, हैदर शेख, मनिषा गच्चे, पांडुरंग गच्चे, इंदिरा पांचाळ हरिदास पांचाळ आदींची उपस्थिती होती.

इंटरनेट, मोबाईल फोन आणि टीव्हीच्या जमान्यात वाचनाची सवय लोप पावत चालली आहे. शाळेच्या परिसरात सुट्टीकालीन वृक्ष वाचनालय सुरू करण्यात आले आहे. सकाळच्या सत्रात झाडांच्या सावलीत मुले वाचनाचा आनंद घेत आहेत. यात मुलांचा सहभाग वाढला आहे. स्वतःच्या आवडीचे पुस्तक मुले निवडतात आणि वाचन करत बसतात. वाचन संस्कृतीला बळ मिळावे यासाठीही हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुस्तकांचीच गुढी उभारुन पुस्तकांना अभिवादन केले. यात स्वराज शिखरे, योगेश मठपती, विद्या गोडबोले, सुहानी कांबळे, वीर गोडबोले, नामदेव पांचाळ, अजिंक्य गोडबोले, सतीश साबणे, शाश्वती गच्चे यांनी सहभाग घेतला. त्यांनी शाळेतील बाल वाचनालयाच्या पुस्तकांची गुढी उभारली. तसेच गुढीचे पूष्पपुजन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मले मतदानाला जायाचे हाई !
## पथनाट्याद्वारे चिमुकल्यांची मतदान जनजागृती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नांदेड :** गेल्या महिनाभरापासून जिल्ह्यात स्वीप द्वारे मतदान जनजागृती करण्यात आली. नांदेड लोकसभा मतदारसंघात उद्या २६ एप्रिल रोजी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जवळा देशमुख मतदान केंद्रांतर्गत शालेय मतदान जनजागृती मंचाच्या वतीने 'मले मतदानाला जायाचे हाई!' हे पथनाट्य सादर करुन मतदारांना आकर्षित केले. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संतोष घटकार यांच्यासह मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, उमाकांत बेंबडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, उपाध्यक्ष चांदू झिंझाडे, मारोती चक्रधर, आनंदा गोडबोले, हैदर शेख, मनिषा गच्चे, माधवदादा गोडबोले, पांडुरंग गच्चे, इंदिरा पांचाळ, हरिदास पांचाळ, तुकाराम गोडबोले, किशन गोडबोले, सुलक्षणा गच्चे आदींची उपस्थिती होती.

केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार नांदेड लोकसभा मतदारसंघांतर्गत जिल्ह्यातील मतदारांमध्ये मतदानाची जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी या दृष्टिकोनातून जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मतदार जागृती मंचाची स्थापना करण्यात आली होती. यानुसार विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले. यात पत्रलेखन, मतदानाची शपथ, घरोघरी मतदानाचा संकल्प, रंगभरण चित्रकला स्पर्धा यांचा समावेश होता. गावातील चौकाचौकात पथनाट्याचे सादरीकरण करुन मतदान करण्याचे चिमुकल्यांनी आवाहन केले. या उपक्रमास गावकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे कौतुक गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, शिक्षणविस्तार अधिकारी सरस्वती आंबलवाड, केंद्रप्रमुख नागोराव जाधव, केंद्रीय मुख्याध्यापक आनंदा नरवाडे यांच्यासह सरपंच माधव पावडे माजी सरपंच साहेबराव शिखरे कैलास गोडबोले आदींनी केले आहे.

# नवी मुंबईत प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडक मोहीम तीव्र

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत 'थ्री आर' संकल्पनेवर विविध उपक्रम राबविण्यात येत असून या अनुषंगाने एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून प्लास्टिक पिशव्या व एकल प्लास्टिकचा वापर थांबविण्याबाबत जनजागृती करण्याप्रमाणेच ठिकठिकाणी तपासणी करुन प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.



या अंतर्गत महापलिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभाग कार्यालयांच्या हद्दीत २२ व २३ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणात मार्केट्स, रेल्वे स्टेशन्स, बस स्थानके, वाणिज्य संकुले, मार्ट, पथविक्रेते, बाजारपेठा अशा विविध ठिकाणी प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमा राबविण्यात आल्या. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे तसेच परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त चंद्रकांत तायडे यांच्या नियंत्रणाखाली, सर्व विभागांचे सहा. आयुक्त यांनी आपापल्या विभाग कार्यालयातील संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यासह या मोहीमा यशस्वीपणे राबविल्या.

यामध्ये २२ एप्रिल रोजी बेलापूर विभागात २ दुकाने, आस्थापना यांची तपासणी केली असता १२ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक आढळल्याने ते जप्त करण्यात आले व प्रत्येकी रु. ५ हजार याप्रमाणे रु.१० हजार दंड वसूल करण्यात आला. त्याचप्रमाणे नेरुळ विभागामध्ये एका व्यावसायिकाकडून २.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्ती व रू.५ हजार दंडात्मक वसूली तसेच वाशी विभागात दोन दुकांनामधून २ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक व एकूण रु.१० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. कोपरखैरणे विभागात एका दुकानदाराकडून २ किलो प्लास्टिक जप्ती व रु.५ हजार दंड रक्कम, घणसोली विभागात २ व्यावसायिकां कडून २.५ किलो प्लास्टिक जप्ती व एकूण रु.१० हजार दंड, ऐरोली विभागात २ व्यावसायिकांकडून ६.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व रु.१० हजार दंड तसेच दिघा विभागात २ व्यावसयिकांकडून रु.१० हजार दंड व १.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले. परिमंडळ २ विभागाच्या भरारी पथकानेही एका व्यावसायिकाकडून अर्धा किलो प्लास्टिक जप्ती व रु.५ हजार दंड वसूल केला. अशाप्रकारे २२ एप्रिल रोजी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधात्मक प्लास्टिक तपासणी धडक मोहिमेत एकूण १३ दुकाने, आस्थापना या ठिकाणांहून एकूण २९.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला तसेच एकूण रु. ६५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. अशाच प्रकारे २३ एप्रिल रोजी बेलापूर विभागात २ व्यावसायिकांकडून ३ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करून प्रत्येकी रु.५ हजार प्रमाणे रु.१० हजार दंड वसूली, वाशी विभागामध्ये २ दुकानांमधून २ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व रू.१० हजार दंडात्मक वसूली आणि तुर्भे विभागात दोन दुकानांमधून २ किलो ७५० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व रु.१० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. ऐरोली विभागात २ व्यावसायिकांकडून ७ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व रु.१० हजार दंड वसूल करण्यात आला. परिमंडळ २ विभागाच्या भरारी पथकानेही एका व्यावसायिकाकडून ३०० ग्रॅम प्लास्टिक जप्ती व रु.५ हजार दंड वसूल केला. अशाप्रकारे २३ एप्रिल रोजी एकूण ९ दुकाने, आस्थापना याठिकाणी सापडलेला एकूण १५ किलो ५० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला तसेच एकूण रु.४५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

अशाप्रकारे २२ व २३ एप्रिल या दोन दिवसात आठही विभाग कार्यालय क्षेत्रात प्रतिबंधात्मक प्लास्टिक विरोधी धडक तपासणी मोहिम राबविण्यात आले. यावेळी अनेक व्यावसायिक व आस्थापना प्लास्टिक पिशव्याऐवजी कागदी व कापडी पिशव्या वापरत असल्याचे निदर्शनास आले.

मात्र या मोहीमेच्या तपासणीत एकल वापर प्लास्टिक आढळलेल्या २२ व्यावसायिक, आस्थापना यांच्यावर दंडात्मक कारवाई करीत रू.१ लक्ष १० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. तसेच एकूण ४४ किलो ५५० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले.

नवी मुंबई शहर प्लास्टिकमुक्त असावे यादृष्टीने विभाग कार्यालयांमार्फत क्षेत्रीय स्तरावर प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम पटवून देत कागदी व कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे तसेच एकल वापर प्लास्टिक वापरातून हद्दपार करण्याचे आवाहन केले जात आहे. याशिवाय तपासणी मोहिमांद्वारे प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर आढळल्यास दंडात्मक कारवाईदेखील करण्यात येत आहे.

# कायदेशीर कारवाईचे आयुक्त जाखड यांचे निर्देश
## परवानगी न घेता निवडणूक विषयक लावल्यास कायदेशीर कारवाई होणार...

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४,कल्याण (ठाणे) :** महापालिकेची परवानगी न घेता, विना परवाना निवडणूक विषयक पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/झेंडे/कमानी लावल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी दिले.

महापालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे, निवडणूक उपायुक्त रमेश मिसाळ, महापालिकेचे सर्व प्रभागांचे सहा.आयुक्त आणि २३- भिवंडी लोकसभा व २४- कल्याण लोकसभा परिक्षेत्रातील मंडप कॉन्ट्रॅक्टर्स, मुद्रक, प्रकाशक यांचे समवेत आयोजिलेल्या बैठकीत बोलतांना आयुक्त इंदु राणी जाखड़ यांनी हे निर्देश दिले.



प्रिंटींग प्रेसचे मालकाने, उमेदवारांचे/पक्षाचे साहित्य छपाईची ऑर्डर स्वीकारतांना दोन व्यक्तींच्या ओळखीसह व उमेदवाराचे/पक्षाचे प्रतिनिधीचे ओळखपत्रासह प्रचार साहित्याची ऑर्डर स्विकारावी, साहित्य छपाई करतांना एकूण प्रतींची संख्या व प्रत्येक प्रतीवर, त्या प्रतीचा अनुक्रमांक असणे आवश्यक आहे. पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानी प्रिंट करणारे मालक यांनी सुध्दा उमेदवारांचे/पक्षाचे साहित्य छपाईची ऑर्डर स्वीकारतांना दोन व्यक्तींच्या ओळखीसह व उमेदवाराचे/पक्षाचे प्रतिनिधीचे ओळखपत्रासह ऑर्डर स्विकारावी तसेच महापालिकेची रितसर परवानगी घेऊनच पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानी लावायची कार्यवाही करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी उपस्थितांना दिले.

छपाई करण्यात आलेले पोस्टर्स/बॅनर्स /होर्डिंग्ज/फलक/कमानी यांच्या प्रत्येक प्रतीवर अनुक्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानी यावर महापालिकेची परवानगी क्रमांक, परवानगीची मुदत, प्रकाशक व पब्लिशर्स यांचे नांव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे रितसर परवानगी घेऊनसुध्दा पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानींवर परवानगी क्रमांक, परवानगीची मुदत, प्रकाशक व पब्लिशर्स यांचे नांव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद न केल्यास ते अनधिकृत आहेत असे समजून कारवाई करण्यात येईल, असेही त्या पुढे म्हणाल्या. ज्या तारखेपर्यंत परवानगी दिली आहे.

ती मुदत संपताच पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानीं व स्ट्रक्चर हे संबंधित एजन्सीनेच काढावयाचे आहे, पब्लिशर्स व पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानीं/झेंडे बनविणाऱ्या एजन्सी यांनी त्यांचे छपाईची संख्या, साईज व याबाबतचा खर्च इ. माहिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ यांचेकडे व महापालिकेकडे तातडीने सादर करावयाचा आहे. तसेच सभा मंडप कॉन्ट्रॅक्टर यांनीसुध्दा सभा/कार्यक्रम संपताच दुसऱ्या दिवशी उभारलेले स्ट्रक्चर काढून टाकावेत, परवानगी कालावधी संपल्या नंतर कोणतेही पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिंग्ज/फलक/कमानीं इ. आढळुन आल्यास संबंधिताकडून दंड वसूल करण्यात येईल, त्याचप्रमाणे महापालिकेकडून करारावर जाहिरातीच्या जागा घेतलेल्या एजन्सी मालकांनी कोणतीही निवडणूक विषयक जाहिरात ठराविक एका पक्षाला देण्यात येऊ नये. समान न्यायाचे तत्व अवलंबवावे. त्याबाबत उमेदवार/पक्ष यांचे सोबत झालेला करार, त्यासाठी झालेला खर्च याचा तपशील संबंधिताने महापालिका व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे तातडीने सादर करणे आवश्यक आहे, अशाही सूचना महापालिका आयुक्त महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी या बैठकीत दिल्या.


# रस्त्यांच्या कडेच्या साईड पट्ट्या गायब... खटक्यांनी अपघाताचे प्रमाण वाढले

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यात सध्याच्या मितीला काही भागातील रस्त्यांनी बऱ्यापैकी कात टाकली असुन साईड पट्ट्या न भरल्याने वाहनधारकांना एक प्रकारे डोकेदुखी चे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे दिवसागणिक काही प्रमाणात छोटे - मोठे अपघात होतानाचे चित्र दिसत आहे. सुपा औद्योगिक क्षेत्राला अगोदर खराब रस्त्यांनी वेढ्यात काढले होते.

परंतु आता तालुक्यातील बहुतेक भागातील रस्त्यांनी बऱ्यापैकी कात टाकली असुन मात्र रस्त्याच्या कडेला असणाऱ्या साईड पट्ट्या न भरल्याने वाहनधारकांना आपली वाहने चालवताना एक प्रकारे मृत्युला निमंत्रण दिल्यासारखे वाटत आहे. विविध योजने अंतर्गत तालुक्यातील रस्ते हे सध्या काही अंशी चांगल्या स्थितीत होत असताना रस्त्याच्या कडेला असणाऱ्या साईड पट्ट्या का भरल्या जात नाही असा प्रश्न वाहनधारकांनी उपस्थित केला आहे. बहुतेक ठिकाणी साईड पट्ट्या भरण्यासाठी मुरमा ऐवजी मातीचा वापर केला जातो.

त्यामुळे पावसाळ्यांच्या दिवसात माती वाहून जाते. व साईड पट्ट्यांना खड्ड्यांचे रूप प्राप्त होते. त्यामुळे दुसऱ्या वाहनांना साईड देताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे अनेक छोटे - मोठे अपघात होतानाचे चित्र अनेकांनी अनुभवले आहे. तेव्हा पारनेर तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांना लागलेले हे ग्रहण केंव्हा मिटेल असा संतप्त सवाल वाहन धारकांनी केला आहे. पारनेर ते टाकळी ढोकेश्वर, ते साकुर संगमनेर रस्ता हा सध्या एकप्रकारे मृत्यूचा सापळा बनला आहे. याला कारण रस्त्याच्या कडेला असणाऱ्या साईड पट्ट्या या खोल झाल्याने सध्या



या परिसरात अपघाताचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढले आहे. तेव्हा या गोष्टींकडे सार्वजनिक बांधकाम विभागाची बघ्याची भूमिका हे धोरण धरल्याने अनेकांना आपल्या जीवाला मुकावे लागले तर काहींनी कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे.

जर साईड पट्ट्या भरल्या नाही तर पुढे किती अपघात होत राहतील हे समीकरण म्हणजे डोके दुखी बनणार यात शंका नाही ? असेही वाहनधारकांनी प्रतिक्रिया देताना बोलले आहे. नगर - कल्याण हा रस्ता महामार्गापैकी एक मानला जातो. परंतु सध्या पारनेर तालुक्याला जाणारे बहुतांश गावांतील महत्त्वाच्या रस्त्यांचे प्रवास करताना रस्त्यांना पाडलेले भयंकर खड्डे, गायब झालेल्या साईड पट्ट्या यामुळे वाहनधारकांना एक प्रकारे संकटमय प्रवासच म्हणावा लागेल. या रस्त्यावर वहतूकीची मोठ्या प्रमाणावर वर्दळ कायम स्वरुपी असते. दुचाकी वाहने, चार चाकी वाहने भरधाव वेगाने ये जा करत असतात.

अशा वेळी दुसऱ्या वाहनांना साईड देताना समोरून येणाऱ्या वाहनांपासून बचाव करण्यासाठी रस्त्याच्या कडेला साईड पट्टी वरून वाहन उतरविणे गरजेचे असते. मात्र या महत्वाच्या रस्त्याच्या कडेला साईड पट्ट्या या खोलवर असल्याने मोठ्या प्रमाणावर अडचणी येतात व अपघात होतात. त्यामुळे या साईड पट्ट्या लवकरात लवकर भरण्याची मागणी वाहनधारकांनी केली आहे.

# गोमांस, जिवंत जनावरांची वाहतूक करणारे २ जण जेरबंद

## ६०० किलो गोमांसासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहमदनगर :** बंदी असतानाही गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांस वाहतुक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेऊर शिवारात सापळा रचत जेरबंद केले आहे.

त्यांच्याकडून ६०० किलो वजनाचे गोमास तसेच १२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून ६ गोवंशीय जातीच्या जनवरानी सुटका करण्यात आली आहे. सलमान अजीज शेख (वय २८ वर्षे, रा. घासगल्ली, कोठला मैदान, अहमदनगर) आवाईज सलाम कुरेशी (वय २० वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला, जेऊर, ता. नगर) अशी त्यांची नावे आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेचे



पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, यांना महाराष्ट्र राज्यात बंदी असलेले गोवंशीय जनावरांची हत्या करुन गोमांस वाहतुक व विक्री करणा-या इसमांची माहिती घेवुन कारवाई करणे बाबत आदेश दिले होते. त्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि तुषार धाकराव, अंमलदार संदीप पवार, सचिन अडबल, संतोष लोढे, रोहित मिसाळ, शिवाजी ढाकणे, रणजित जाधव, भाऊसाहेब काळे, संभाजी कोतकर यांच्या पथकला गोमास वाहतुक व विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन रवाना केले. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाला पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार व एका पिकअप मधुन तालुक्यातील जेऊर येथुन संभाजीनगर कडे गांवशीय जातीचे गोमांस व जिवंत जनावरे घेवुन जाणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने जेऊर गांवातील चौकामध्ये सापळा रचत २ जणांना गजाआड केले.

त्यांच्याकडून १ लाख ८० हजार रुपये किंमतीचे ६०० किलो वजनाचे गोमास, १ लाख २० हजार रुपये किंमतीची ६ मोठी जिवंत जनावरे, ५ लाख रुपये किंमतीचा १ पिकअप, ४ लाख रुपये किंमतीची १ स्विफ्ट कार असा एकूण १२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# 'स्विप' अंतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम




**अक्षराज : गणेश आकोदे**

**दि.२४, भोकरदन (जालना) :** लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने प्रशासनाच्या वतीने भोकरदन तालुक्यात स्विप अंतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने बुधवार, दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथे महिला मतदारांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर निबंध स्पर्धेचा विषय 'लोकशाहीमध्ये मतदानाचे महत्त्व' हा होता सदर निबंध स्पर्धेमध्ये बचत गटाच्या महिला सदस्या, मतदार महिला, ज्येष्ठ मतदार महिला यांचा सहभाग होता. यामध्ये शिवकन्या प्रकाश रामफळे, कल्याणी राजेश कंगले, अंजू राजेश थोटे यांनी व सहभागी महिलांनी लोकशाही बद्दल चे मत व्यक्त केले. सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा लोकशाही बळकट करावी. मतदानाची टक्केवारी वाढावी. असे त्यानी स्पष्ट केले. हा कार्यक्रम गटविकास अधिकारी, पंचायत समिती भोकरदनचे विष्णू बोडखे, दिलीप शहागडकर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,भोकरदन यांच्या मार्गर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. शहागडकर यांनी महिला मतदारांना, मतदानाची टक्केवारी वाढवावी, सर्वांनी मतदान करावे. असे आपल्या भाषणातून संबोधित केले. तालुका स्वीप आयोकॉन गणेश सोळुंके यांनी कार्यक्रमाचे महत्व विषद केले.

# यंदाचा उन्हाळा शेतकऱ्यांसाठी ठरतोय अग्निपरीक्षा...

## सुर्य आग ओकू लागल्याने जनजीवन विस्कळीत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहमदनगर :** गेल्या काही दिवसांपासून सुर्य आग ओकू लागला आहे. याचा जनजीवनावर परिणाम झाला असून जनजीवन विस्कळित झाले आहे. उष्णतेचा कहर असाच सुरू राहिला तर पुढचे दोन महिने अर्थात साठ दिवस शेतकरी बांधवांसाठी अग्निपरीक्षेचे ठरणार आहेत. उन्हाच्या प्रचंड कडाक्यामुळे शेती कामाचे पूर्ण नियोजन कोलमडले असल्याने बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे.

दरम्यान, हवामान खात्याने सध्या सुरू असलेली उष्णतेची लाट आणखी तीन ते चार दिवस राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकऱ्यांची आणखी चिंता वाढली आहे. कधी नव्हे ते यंदा अनेक वर्षांनंतर फेब्रुवारी महिना अखेरपर्यंत बऱ्यापैकी थंडी राहिली. परंतु , त्यानंतर मात्र मार्च महिना सुरू होताच उन्हाचा कडाका वाढायला सुरुवात झाली. दरवर्षी होळी नंतर उन्हाचा तडाखा सुरू होत असतो. यंदा मात्र होळीच्या अगोदरच उन्हाचा तडाखा सुरू झाला. यामध्ये दिवसेंदिवस वाढत होत असून तापम



ानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेले आहे. सकाळी सात वाजल्यापासून प्रखर उन्हाला सुरुवात होत आहे. याचा जनजीवनावर परिणाम झाला आहे. सकाळी ११ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. बाजारपेठेत शुकशुकाट जाणवत आहे. कडक उन्हापासून बचाव होण्यासाठी नागरिक थंडपेयाचा आसरा घेत आहेत. तीव्र उष्णतेमुळे प्रचंड उकाडा निर्माण होत असून घरात थांबणे देखील मुश्किल झाले आहे.

उकाड्याने शरिरातून घामाच्या धारा वहाताहेत. प्रचंड उष्णतेपुढे एसी व पंखे देखील विफल ठरत आहे. महावितरणचा विजपुरवठा अत्यंत कमी दाबाने सुरू असल्याने विजेवर चालणारी उपकरणे देखील कूचकामी ठरल्याने अंगाची लाही- लाही होत आहे. यातून सुटका होण्यासाठी अनेकांनी गर्द झाडांच्या सावलीचा आश्रय घेतला आहे. एकीकडे नागरिकांची अशी स्थिती असताना दुसरीकडे मात्र शेतीच्या काम ावर उष्णतेचा विपरीत परिणाम झाला आहे. उन्हाच्या तीव्र तडाख्याने शेतातील पिके लवकर पाण्यावर येऊ लागली आहेत. त्याचच महावितरणने आठवड्यातील चार दिवस दिवसा व चारा दिवस रात्री पीकांना पाणी भरण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. सध्या अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची कांदा काढणी सुरू झाली आहे. उष्णतेच्या लाटेमुळे चारा पिके करपू लागली आहेत. त्यामुळे दुभत्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. एकंदरीत उष्णतेच्या लाटेचा फटका शेतकरी वर्गाला जास्त बसत आहे.

# निघोज येथील मळगंगा देवीची काठी मिरवणूक उत्साहात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अ.नगर) :** मळगंगा देवीचा मुख्य यात्रा उत्सव दि. १ मे पासून सुरू होत असला तरी देवीला हळद लावणे तसेच ८५ फूट काठीची मिरवणूक हे उस्तव मोठ्या उत्साहात संपन्न झाले आहेत. सोमवार, दि.२२ रोजी देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला असून मंगळवार, दि.२३ रोजी देवीच्या काठीची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने संपन्न करण्यात आली. सजवलेली ही काठी ८५ फूट उंचीची असल्याने मोठ्या शिताफीने ही मिरवणूक मळगंगा देवीची हेमांडपंथी बारव या ठिकाणी साधारण ५ वाजता सजवली गेली. त्यानंतर मळगंगा देवीच्या जयजयकार करीत ही काठीची मिरवणूक ग्रामपंचायत चौक ते मळगंगा मंदीर अशाप्रकारे वाजत गाजत आणली गेली. यावेळी हजारो भावीक या काठीला उचलण्याचा आनंद घेत होते. मळगंगा देवीच्या जयघोषाने आसमंत दणाणून गेला होता. देवीचा जयजयकार तसेच देवीची आराधना करीत हजारो भाविक तसेच ग्रामस्थ मिरवणुकीत सामील झाले होते. यावेळी भंडार्याची उधळण मोठ्या प्रमाणात करण्यात आली. देवीच्या मंदीराच्या शिखराला काठी लागल्यानंतर अकरा दिवस हा यात्रेचा उस्तव सुरू असतो. यामध्ये शेतीच्या कामांना पुर्णपणे विश्रांती दिली जाते. ही पुर्वपरंपरा आजही जतन करण्यात येते. अकरा दिवस पशुहत्या बंद केली जाते या अकरा दिवसात घरोघर सवाष्णीचा कार्यक्रम संपन्न होत असतो. या निमित्ताने देवीला पुरण पोळीचा नैवेद्य दाखवला जातो तसेच आसपासच्या महिलांना सवाष्णी साठी बोलवतात तसेच त्यांचा मानसन्मान, हळदी कुंकू लावीत त्यांनाही पुरण पोळीचा महाप्रसाद दिला जातो. शेकडो वर्षांपासून सुरू असलेली ही धार्मिक परंपरा मोठ्या भक्तिभावाने आजही सुरू आहे.

# मतदार जनजागृती कार्यक्रम ; विद्यार्थ्यांनी साकारली मानवी साखळी

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि. २४, कळंब (धाराशिव) :** येत्या ७ मे रोजी धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. जास्तीत जास्त संख्येने मतदान व्हावे, यासाठी मतदानास पात्र असलेल्या घरातील सर्व व्यक्तींनी मतदान करावे. असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ४०- धाराशिव लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्याबाबत मतदार जनजागृती कार्यक्रम ाचे आयोजन तुळजाभवानी स्टेडियम येथे आज २४ एप्रिल रोजी मतदार जनजागृती कक्षाच्या वतीने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ. ओंबासे बोलत होते.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष,सहायक जिल्हाधिकारी प्रियंवदा म्हाडदाळकर,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

रांगोळी कलाकार राजकुमार कुंभार यांनी मतदार जागृतीचे निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह असलेली भव्य रांगोळी काढली.रांगोळीच्या बाजूला विद्यार्थ्यांनी हातात हात घेऊन मानवी साखळी साकारून मतदान जागृतीचा संदेश दिला.यावेळी शिक्षक उदय पाटील यांचा हसम ुखराय बोलका बाहुल्याने मतदानाविषयी मनोगत व्यक्त




करून मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी डॉ ओंबासे यांनी हवेत तिरंगी फ ुगे सोडून मानवी साखळीचे उद्घाटन केले.यावेळी उपस्थितांना मतदानाची प्रतिज्ञा देण्यात आली. मान्यवरांचे स्वागत भारतीय संविधान पुस्तक देऊन करण्यात आले.

धाराशिव शहरातील ३२ शाळा महाविद्यालयाचे २००० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.या विद्यार्थी,विद्यार्थीनींनी मतदार जनजागृती कार्यक्रमातंर्ग मानवी साखळी साकार करुन मतदार जनजागृती केली. पोदार इंटरनॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांच्या बँड पथकाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

मतदार जनजागृतीच्या या कार्यक्रमाला धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च म ाध्यमिक विद्यालय,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,रामकृष्ण परमहंस उच्च माध्यमिक विद्यालय,शम्युल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,आर्य चाणक्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, तेरणा उच्च माध्यमिक विद्यालय, अल्लामा सिद्दीक उर्दू हायस्कूल,तेरणा हायस्कूल,धाराशिव प्रशाला,पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, रविशंकर माध्यमिक व उच्च म ाध्यमिक विद्यालय,भाई उद्धवराव पाटील प्रशाला,साराह माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,भगीरथाबाई लाटे हायस्कूल,नवीन माध्यमिक विद्यालय,समता माध्यमिक विद्यालय, शरद पवार माध्यमिक विद्यालय, ग्रीनलँड इंग्लिश मीडियम स्कूल, अभिनव इंग्लिश मीडियम स्कूल, धीरूभाई अंबानी माध्यमिक विद्यालय,जीवनराव गोरे माध्यमिक विद्यालय, सत्यभामा शिंदे माध्यमिक विद्यालय,भारत विद्यालय,शिवाजी विद्यालय,डॉ.चंद्रभान सोनवणे उच्च माध्यमिक विद्यालय,बिल गेट्स उच्च म ाध्यमिक विद्यालय,जिल्हा परिषद कन्या शाळा,विद्याम ाता इंग्लिश स्कूल, आसरा उर्दू हायस्कूल,मौलाना आझाद उर्दू हायस्कूल व तेरणा पब्लिक स्कूलचे २००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाला संबंधित शाळा,महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य तसेच शिक्षक व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार शिक्षक विशाल सूर्यवंशी यांनी मानले.तुळजाभवानी स्टेडियम येथून निघालेली रॅली शहरातील मुख्यमार्गाने मार्गक्रमण करीत मतदान जनजागृतीचा संदेश देत सहभागी विद्यार्थ्यांनी विविध घोषणा दिल्या.

# ठाण्यात खंडणी विरोधी पथक व गुन्हे शाखेकडून अग्नीशस्त्र साठयासह आरोपी अटकेत




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. २४,ठाणे :** लोकसभा निवडणुक प्रकीया २०२४ कायदा व सुव्यवस्थेस बाधा न येता शांततेत पार पडावी याकरीता मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना जास्तीत जास्त अवैध शस्त्र, अंमली पदार्थ विरोधी कारवाया करणे बाबत सक्त आदेश दिले आहेत. सदर अनुषंगाने दिनांक १८/०४/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर प्रयत्नशील असताना सपोनि/ सुनिल तारमळे व पोउनि/विजयकुमार राठोड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शंभु महतो नावाचा इसम त्याचेकडे मोठया प्रमाणावर अवैध अग्नीशस्त्र, काडतुसे, गावठी कट्टे घेवुन विकीकरीता साकेत रोड, राबोडी, ठाणे येथे येणार आहे. सदर ठिकाणी सापळा रचला असता शंभु सुरेश महतो, वय ३५ वर्षे, धंदा बेकार, रा. टागोर नगर विकोळी पुर्व, मुबई मुळ गाव- बिहार हा अवैध रित्या अग्निशस्त्रासह मा. पोलीस आयुक्त सो ठाणे शहर यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आला त्याचेविरूध्द राबोडी पोलीस स्टेशन गु.र.न ४५४/२०२४ शस्त्र अधिनियम कलम. ३, २५ (१ब) (अ) सह महा.पो.का. कलम ३७ (१)१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीची २५/०४/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर आहे.

गुन्हयाचे तपासादरम्यान नमुद आरोपीकडून एकूण ४ पिस्टल, २ गावठी कटटे, १ मॅगझीन व १८ जिवंत काडतुसे असे एकूण ३,४०,०००/- रूपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी इसमाने वरील अग्नीशस्त्र साठा नेमका कोणत्या कारणासाठी आणला होता याबाबत पुढील तपास खंडणी विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक सुनिल तारम ळे करीत आहेत. पोलीसांनी केलेल्या तपासात नमुद आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे खूनाचा गुन्हा दाखल असुन तो जामीनावर बाहेर असल्याचे आढळुन आले आहे.

# शिरवंजे रायकपाडा येथे हनुमान जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि. २४, शहापूर (ठाणे) :** जय हनुमान ग्रामस्थ मंडळ शिरवंजे हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी सालाबाद प्रमाणे यावर्षी शिरवंदे रायकर पाडा येथे हनुमान जन्मोत्सव आनंदाने साजरा करण्यात आला सकाळी अभिषेक करून मिरवणूक काढण्यात आली शिवव्याख्याती करुणा सचिन गगे बांगर यांचे शिवव्याख्यान ठेवण्यात आले होते तसेच डबलबारी भजनांचा जंगी सामना ठेवण्यात आला होता.

आई एकविरा भजनी मंडळ डोंबिवली गायिका सुजाता पाटणकर तर नागेश्वर भजनी मंडळ खालापूर खोपोली तर सूत्रसंचालन करूना सचिन गंगे बांगर तसेच यशवंत फडें यांनी केले.

या वेळेस व्यासपीठावर उपस्थित भिवंडी लोकसभेचे माजी खासदार सुरेश टावरे माजी, आमदार पांडुरंग बरोरा यांचे सुपुत्र निखिल बरोरा आमदार दौलत दरोडा यांचे सुपुत्र करणं दरोडा,जे के करण, हरेश धानके महेश पतंगराव,प्रम ोद देसले, राजेश तिवरे, वाशिंद सरपंच राजेंद्र महस्कर, श्रेयस वेखंडे,प्रविण मोरे, शशिकांत म्हस्कर, विनोद हरळ, हरिश्चंद्र फर्डे, बाळाराम हरळ तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

पत्रकार शामकांत, पतंगराव विठ्ठल धारवणे, संदीप चौधरी, संतोष दवणे तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.